# मा.अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा)

## कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य, अमरावती.

विभागीय आयुक्त कार्यालय, जुना बायपास रोड, अमरावती

दूरध्वनी क्रमांक 0721-2662061 **Email :- vnssm.amt@gmail.com**


**कै.व.ना.शे.स्वा.मि.अम/म.स./३८९/२०२५** **दिनांकः ३०/०५/२०२५**

---

**जाहीर सुचना (दुसरी वेळ)**

**विषयः-** मा. अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन यांच्याकरीता वाहन भाडे तत्वावर घेण्याच्या अनुषंगाने दरपत्रक सादर करण्याबाबत...

सोबत जोडलेल्या अटी व शर्तीनुसार इनोव्हा क्रिस्टा डिझेल वाहन हे मासिक भाडेतत्वावर घेण्याकरीता खालीलप्रमाणे निविदा दि.०५/०६/२०२५ सायंकाळी ४.०० वाजे पर्यंत कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, विभागीय आयुक्त कार्यालय, दुसरा माळा अमरावती येथे दोन लिफाफे पध्दतीने दरपत्रक मागविण्यात येत आहे.

**प्रथम लिफाफामध्ये**

१) इनोव्हा क्रिस्टा वाहन सन २०२२ चे नंतर पासींग असल्याबाबत वाहनाचे आरसी बुक सत्यप्रत साक्षांकित

२) वाहन दरपत्रक भरतेवेळी एकुण धावसंख्या ५०,००० किमी चे वर झालेले नाही असे वाहन मालक/ ट्रॅव्हल्स कंपनीचे प्रोप्रायटर यांचे हमीपत्र (सध्याचे किमी धावसंख्येवर)

३) वाहनाला टॅक्सी परमीट असल्याचे आरटीओ यांचे मंजुरीचे सत्यप्रत

४) निविदेत नमूद अटी व शर्तीनुसार वाहन भाडे तत्वावर देण्यास तयार असल्याबाबतचे वाहन मालक/ ट्रॅव्हल्स कंपनीचे प्रोप्रायटर यांचे हमीपत्र (साध्या कागदावर)

**व्दितीय लिफाफामध्ये**

१) फक्त दरपत्रक निवेदीतील नमुनानुसार वाहन मालकाच्या स्वाक्षरीसह

दि.०६/०६/२०२५ ला निविदा मा.अपर आयुक्त(सा.प्र.), तहसिलदार (सा.प्र.), लेखाधिकारी (सा.प्र.) यांच्या उपस्थितीत उघडण्यात येतील. लिफाफा - १ मधील प्रस्तावित अटी व शर्ती पुर्ण न केल्यास लिफाफा -२ उघडण्यात येणार नाही.

(मा.अपर आयुक्त सा.प्र.यांच्या मान्यतेने)

**(प्रमोद कापडे)**
**जनसंपर्क अधिकारी,**
**कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन,**
**महाराष्ट्र राज्य, अमरावती.**

# मा.अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा)
## कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, महाराष्ट्र राज्य, अमरावती.


विभागीय आयुक्त कार्यालय, जुना बायपास रोड, अमरावती

दूरध्वनी क्रमांक 0721-2662061 **Email :- vnssm.amt@gmail.com**


**कै.व.ना.शे.स्वा.मि.अम/म.स./३९१/२०२५** **दिनांक: ३०/०५/२०२५**

---

## जाहीर सुचना (दुसरी वेळ )

**विषय:-** मा. अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन यांच्याकरीता वाहन भाडे तत्वावर घेण्याच्या अनुषंगाने दरपत्रक सादर करण्याबाबत...

उपरोक्त विषयानुसार मा. अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन यांचेकरिता एका वाहनाची सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षातील, जुन २०२५ ते एप्रिल २०२६ या कालावधी-करिता आवश्यकता आहे. सदर वाहन हे मासिक भाडेतत्वावर घेण्याचे नियोजित आहे.

त्याअनुषंगाने प्रतिमाह ७००० ते ८००० किलोमीटर प्रमाणे वाहन भाडयाचे दर खालीलप्रमाणे सादर करावे. व इच्छुकांनी खाली दिलेल्या नमुन्यामध्ये अटी व शर्तीच्या अधिन राहून दरपत्रके ही दिनांक ०५ /०६/२०२५ रोजी सायं ०४.०० वाजेपर्यंत विभागीय आयुक्त कार्यालय, बायपास रोड कैम्प, अमरावती या कार्यालयातील सामान्य प्रशासन शाखेत सादर करण्यात यावेत, विहीत मुदतीनंतरची दरपत्रके स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच आपले नोंदणीकृत एजन्सीचे लेटरपॅडवर खालील नमुन्यात दर सादर करावे.

| अ.क्र. | गाडीचा प्रकार | मासिक भाडे | | मासिक कि.मी. | | अतिरिक्त कि.मी.दर | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | इनोव्हा क्रिस्टा | वाहन चालका सह | विना वाहन चालकासह | इंधनासह | इंधनाशिवाय | इंधनासह | इंधनाशिवाय | वाहन २०२२ चे नंतरचे असावे व ५०,००० धाव किमी पेक्षा कमी झालेले असावे. |
| | | | | | | | | |

**अटी व शती :-**

१. वाहनाच्या संपूर्ण देखभालीचा खर्च, विमा इ. वाहन मालकाने सहन व वहन करावा. गाडीभाडे नमुद करतांना सर्व करासह (जीएसटीसह) नमुद करावे.

२. वाहनाचे टॅक्सी परवाना, नोंदणी प्रमाणपत्र, वाहनांचे विमा, वाहन कर, चालकाचे लायसन्स इ. आवश्यक कागदपत्राची एक प्रत वाहन ताब्यात देतेवेळी सादर करावी.

३. वाहन कार्यान्वीत झाल्यानंतर वाहनाचे नोंदणी पुस्तक, विमा भुगतान पावती, पीयुसी वाहनामध्ये ठेवणे आवश्यक आहे. तसेच संस्थेचे पॅनकार्ड, बँक स्टेटमेंट मागील ३ आर्थिक वर्षाचे व इतर आवश्यक कागदपत्राची पुर्तता करणे अनिवार्य आहे.

४. वाहनाच्या भाडे रकमेमधून शासन नियमानुसार आयकर (TDS) कपात करण्यात येईल.

५. वाहन चालकाचा पगार गाडी मालकाने करावा. वाहन चालकाकडे (Permanent License/Taxi Permit License) कायमस्वरुपी परवाना असणे आवश्यक आहे व त्याची एक झेरॉक्स प्रत करारनाम्यासोबत सादर करावी. वाहन दौऱ्यावर असतांना वाहन चालकाचा दैनंदिन भत्ता वाहन मालकाने द्यावा. या कार्यालयातर्फे किंवा शासनाकडून कोणत्याही प्रकारचा भत्ता मिळणार नाही.

६. वाहन कामावर असतांना वाहनाची तुटफुट, अपहार किंवा अपघात झाल्यास त्यांची जबाबदारी वाहन मालकाची राहील. या कार्यालयातर्फे किंवा शासनाकडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई मिळणार नाही. मंजूर केलेले वाहन नादुरुस्त

झाल्यास/असल्यास तात्पुरत्या स्वरुपात पर्यायी सुस्थितीतील दुसरे वाहन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

७. वाहन व वाहन चालक २४ तास शासन सेवेत राहील.

८. वाहनास लागणारे डिझेल वाहन मालकाने पुरविण्यात आल्यानंतर वापर झालेले इंधन व वाहनाने कापलेले अंतर यांचा हिशेब ठेवण्याकरिता वाहन चालकाने एक लॉगबुक ठेवावे व नियमित लॉगबुक वापरणाऱ्या अधिकाऱ्यांकडून त्यावर स्वाक्षरी घेवून पूर्ण करुन मासिका गोषवारा लेखा विभागात सादर करावा,

९. मा. अध्यक्ष यांना राज्यमंत्री दर्जा असून ते शासकीय कामानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात कोठेही दौरा करु शकतात, या पदाच्या कर्तव्यसूची मध्ये बाहेरील दौरे समाविष्ट असल्याने वाहन चालकाचे कामाचे तास निश्चित राहणार नाही त्यामुळे वाहन वाहनमालकासह गरजेनुसार उपलब्ध करुन द्यावे लागेल यापायी वाहन चालकाने अतिरिक्त मानधनाची मागणी केल्यास अतिरिक्त मानधन/भत्ता देण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादाराची राहील.

१०. शासकीय कार्यालयातील सदर वाहन राज्यमंत्री दर्जाचे अधिकारी असल्यामुळे वाहन चालकाला सौजन्यपुर्ण वागणुकीबाबत सुचना देऊन कामावर ठेवावे, वाहन हे वाहन मालकाचे असल्यामुळे वाहन चालकाने गैरवर्तन किंवा कोणत्याही प्रकारचा गुन्हा केला असता, नियमानुसार कृत्यास जबाबदार असलेले वाहन चालक/मालकास जबाबदार धरुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल. वाहन चालकाने कर्तव्यावर असतांना पांढरा पँट व पांढरा शर्ट असा गणवेश परिधान केलला असावा. वाहन चालकाचे राहणीमान स्वच्छ व निटनेटके असावे. वाहन चालक हा निर्व्यसनी असावा.

१२. मुक्कामाचे वेळी वाहन चालकाचा रात्रीचा मुक्काम व आहार भत्ता देण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील याबाबत या कार्यालयाकडून कोणताही अग्रीम वा रक्कम मिळणार नाही.

१३. वाहनावर टोल टॅक्स असल्यामुळे सदर टोल टॅक्स वाहन मालकाने वहन करावा लागेल. त्याबाबत आवश्यक ती व्यवस्था करण्याची जबाबदारी वाहन मालकाची राहील.

१४. या कार्यालयास केव्हाही वाहनाची सेवा आवश्यक नसल्यास कोणत्याही वेळेस, कोणतेही कारण न देता, तसेच वरील अटी व शर्तीचा भंग झाल्यास एकतर्फी करारनामा रद्द करण्याचे सर्व हक्क अपर आयुक्त (सा.प्र.) यांनी राखून ठेवले आहे. याबाबत वाहन मालक व चालकाची सबब चालणार नाही.

१५. वाहन मालकास उपरोक्त अटी व शर्तीबाबत रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा वाहन कार्यालयात लावण्यापुर्वी करणे बंधनकारक राहील.

१६. वाहन चालकास वाहन आतून व बाहेरुन दररोज स्वच्छ राहील याची दक्षता घ्यावी. वाहनामध्ये सुगंधीत परफ्यूम आणि टिशु पेपर ठेवण्यात यावे. तसेच वाहना करिता पांढरे शुभ्र कापडी सिट कव्हर लावण्यात यावे. तसेच वाहन वापर धावसंख्येनुसार वाहनाची सर्व्हिसिंग व वाहनाचे टायर बदलविणे ही जबाबदारी वाहनमालकाची राहील.

१७. ज्या दिवशी वाहन कार्यालयास उपलब्ध करुन दिले जाणार नाही. त्या प्रत्येक दिवसाला रु.५०००/-प्रमाणे दंडात्मक रक्कम भाड्यातून कपात करण्यात येईल.

१८.वाहनासाठी लागणारे डिझेल वाहनमालक आवश्यकतेनुसार पुरवठा करेल व दरमहा लॉगबुक /दौ-यानुसार सादर करेल. व अनुदान उपलब्धतेनुसार डिझेल व वाहनभाडे अदायकी केली जाईल.

१९. विहीत नमुन्यातच दर भरणे आवश्यक आहे. अन्यथा दरपत्रक स्विकारले जाणार नाही.

२०.मंजूर दरपत्रकाची वार्षीक रक्कम १० लाखाचे वर होत असल्यास सदर दरपत्रक प्रक्रिया रद्द करुन ई.निविदा काढण्यात येईल.

अपर आयुक्त (सा.प्र.)
अमरावती